**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## विद्यापीठाच्या ॲकेडेमिक ऑडिट जागरुकता व प्रशिक्षण कार्यक्रमाचे २१ ते २५ सप्टेंबर दरम्यान आयोजन

### १९०८ पात्र सहभागींनी केली नोंदणी

### शैक्षणिक सत्र २०२१-२२ पासून विद्याविषयक लेखा परिक्षणाच्या माध्यमातून महाविद्यालयांचे संलग्निकरण

अमरावती -

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाद्वारे **ॲकेडेमिक ऑडिट जागरुकता व प्रशिक्षण** कार्यक्रमाचे आयोजन दि. २१ ते २५ सप्टेंबर, २०२० या दरम्यान करण्यात आले आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ प्रमाणे विद्याविषयक लेखा परिक्षेच्या माध्यमातून महाविद्यालयांचे संलग्निकरण चालू ठेवण्याची तरतूद आहे. यानुषंगाने विद्यापीठाने विद्याविषयक लेखा परिक्षा मानके व कार्यप्रणाली तयार केली असून निदेश क्र. ५/२०२०, दि. १८/०६/ २०२० यासाठी निर्गमित करण्यात आलेला आहे. जारी करण्यात आलेल्या निदेश क्र. ५/२०२० च्या अनुषंगाने **पूल ऑफ एक्सपर्ट** बनविण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

उपरोक्त मानके व कार्यप्रणालीप्रमाणे जागरुकता व प्रशिक्षणाचा कार्यक्रम व पॅनल डिस्कशन आदी ऑनलाईन व्हिडीओच्या माध्यमातून दि. २१ ते २५ सप्टेंबर, २०२० दरम्यान होतील. विद्याविषयक लेखा परिक्षण जागरुकता व प्रशिक्षण कार्यक्रमाकरीता विद्यापीठातील अधिसभा, व्यवस्थापन परिषद व विद्या परिषदेतील सर्व शिक्षक सदस्य, विद्यापीठातील निवडक अधिकारी, सर्व प्राचार्य, प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, आयक्युएसी/नॅक/एनबीए चे समन्वयक इत्यादींचा एक गट व विद्याविषयक लेखा परिक्षण प्रशिक्षण करीता १० वर्षे व त्यापेक्षा अधिक अनुभव असलेले सहा. प्राध्यापक, ग्रंथपाल, संचालक, शारीरिक शिक्षण व क्रीडा तसेच १५ वर्षे व त्यापेक्षा अधिक अनुभव असलेले प्रबंधक, अधिक्षक, लघुलेखक, मुख्यलिपिक यांचा दुसरा गट यांचेकरीता आयोजित केलेला आहे. या कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या मधून **पूल ऑफ एक्सपर्ट** तयार होईल.

यासाठी संलग्नित महाविद्यालयातील विविध वर्गवारीतून माहिती मागविण्यात आली असून सदर माहितीच्या आधारे प्रत्येक सहभागीला ॲकेडेमिक ऑडिट जागरुकता व प्रशिक्षण कार्यक्रमासाठी स्वतंत्रपणे त्यांच्या ईमेलवर लिंक पाठविण्यात आली होती. त्यामध्ये ११०८ पात्र सहभागींनी सदर कार्यक्रमासाठी नोंदणी केली असून सहभागींना वक्त्यांच्या नावासमोर असलेल्या लिंकवर क्लिक करुन सर्व व्हिडीओ बघता येईल. व्हिडीओ लिंकच्या माध्यमातून ॲकेडेमिक ऑडिट संदर्भातील सविस्तर माहिती देण्यात आली असून त्या सर्व लिंक दि. २१, २२ व २३ सप्टेंबर, २०२० या दरम्यान बघायच्या आहेत. सहभागींनी याकरीता आपल्या मोबाईल अथवा लॅपटॉपवर जिमेल अकॉऊन्ट, इंटरनेट कनेक्शन, टेलिग्राम ॲप व गुगल ॲप डाऊनलोड करणे आवश्यक आहे.

सदर कार्यक्रमासंबंधी काही अडचणी असल्यास आपल्या ईमेलवर **आस्क दि क्युरी** ही लिंक दिली असून त्यावर दि. २४ सप्टेंबर, २०२० पर्यंत आपण आपल्या शंका पाठवू शकता. दि. २५ सप्टेंबर, २०२० रोजी दु. १२.०० ते २.३० दरम्यान पॅनल डिस्कशनच्या माध्यमातून आपल्या सर्व प्रश्नांची उत्तरे दिल्या जाणार असून यामध्ये विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर, प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.एफ.सी. रघुवंशी, मानव विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. अविनाश मोहरील, आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. मनिषा काळे व ह.व्या.प्र.मं., अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.बी. मराठे आदी तज्ज्ञ उपस्थित राहणार आहे. सहभागींना पॅनल डिस्कशनमध्ये सहभागी व्हावयाचे असून त्याकरीता युट्युब लिंक स्वतंत्रपणे पाठविण्यात येईल. नोंदणीसोबतच आपल्याला टेलिग्राम ग्रूपमध्ये देखील मोबाईलच्या माध्यमातून सहभागी व्हावयाचे असून अन्य सर्व सूचना या टेलिग्राम ग्रूपवर दिल्या जाणार आहेत. सदर टेलिग्राम ग्रूपची लिंकसुद्धा सहभागींच्या ईमेलवर पाठविण्यात आली आहे.

सदर कार्यक्रमासंबंधी सर्व सूचना विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आल्या असून सहभागींनी दिलेल्या लिंक वापरुन सर्व व्हिडीओ बघावेत व पॅनल डिस्कशनमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी केले आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. २१/०९/२०२०.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

प्र. जनसंपर्क अधिकारी